निशाणी क्र. १९/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - इरफान रज्ञाक परमार, |
| वय | - ४५ वर्षे, |
| व्यवसाय | - कॉन्ट्रॅक्टर, |
| राहणार | - शास्त्रीनगर, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....</u>**

१) दि. ०९/०६/२०२४ रोजी मला खोपोली पोलीसांनी पोलीस स्टेशन मध्ये बोलवले होते. त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच मुकूंद वाघमारे हा होता. तसेच मुख्तार धनसे हे होते. तसेच तीन पोलीस होते. त्यानंतर आम्ही पोलीसांसोबत शिशू मंदीर शाळा, खोपोली येथे गेलो. घटनास्थळ हे शिशू मंदीर शाळेच्या गेटच्या बाजुला होते. त्या ठिकाणी पोलीसांना एक हॉकी स्टीकचा लाकूड सापडला. तो पोलीसांनी ताब्यात घेतला. त्या ठिकाणी पोलीसांनी पंचनामा केला व आमच्या सह्या घेतल्या. पंचनाम्याच्यावेळी पोलीसांनी फोटो काढले. आता मला दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी २०** देण्यात आली. आता मला दाखविण्यात आलेले फोटो तेच आहेत. फोटोंना **आर्टीकल अ** देण्यात आले. जप्त करण्यात आलेली हॉकी स्टीक दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता साक्षीदारास एम.आर. क्र. २२/२०२५ लाकडी स्टंम्प दाखविण्यात आला. साक्षीदाराने मुद्देमाल ओळखल्याने त्यास **आर्टीकल ब** देण्यात आले.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. टी. वाडेकर यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, मुख्तार धनसे हे माझे मित्र आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रेहान धनसे हा मुख्तार धनसे यांचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या

म्हणण्यानुसार पोलीसांनी घटनास्थळावरुन हॉकी स्टीकचा दांडका जप्त केला. हे म्हणणे खरे आहे की, हॉकी स्टीक व स्टंम्प यामध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे रहदारीचे व वर्दळीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयासमोर असलेला दांडका हा हॉकी स्टीकचा दांडका नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्त करण्यात आलेले लाकडी दांडके शिशू मंदीर गेटच्या बाजुला असलेल्या गटारात पडलेले असताना सापडले होते. हे म्हणणे खरे आहे की, शिशू मंदीर शाळेच्या गेटच्या समोर गटार असून त्या गटाराला लागून रस्ता आहे. मला मुख्तार धनसे यांनी पंचनाम्यासाठी पोलीस स्टेशनला बोलवले होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या अगोदर पासूनच मी तसेच मुख्तार धनसे व इतर लोक पोलीस स्टेशन मध्ये हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, केवळ मुख्तार धनसे यांच्यासाठी मी पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटना पावसाळ्याच्या दिवसात घडलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळा लागूनच चक्की, माशांचे दुकान, दिप्ती बुक स्टॉल, चायनीज भेळचे दुकान, झेरॉक्सची दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरुन आम्ही पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावरील सह्या मी पोलीस स्टेशन मध्ये केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, हॉकी स्टीकचा दांडका आज कोर्टासमोर नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**
**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.04.09 17:36:38 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - ०९/०४/२०२६